सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.
नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३
अ/०६, ५१,५२,५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

संदर्भ क्र. : SCN·Assoc/77/2025 दिनांक : 17/08/2025

# परिपत्रक क्र.२०

प्रति,
मा.अध्यक्ष/ सचिव,
सराफ चौधरी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (क्र.१,२,३,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३ व बी-१५)
सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल,
कांदिवली (पू), मुंबई - ४००१०१.

महोदय/ महोदया,

सराफ चौधरी नगर वसाहतीतील सर्व सन्माननीय सभासद/ रहिवाशी यांना कळविण्यात येते कि, SCN वसाहतीचा पुर्नविकास करणे कामी सराफ चौधरी नगर को- ऑप हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि. चे कामकाज व व्यवस्थापनाचा कार्यभार संबंधी परिपत्रके काढून सर्व सन्मानीय सभासद यांना त्यांचे संस्थेमार्फत वेळोवेळी माहिती देत आहोत.

आपल्या असोसिएशनच्या स्थापनेला दोन वर्षे सहा महिने पूर्ण होत असताना, आपण सर्वांनी मिळून आपल्या उपविधीत काही सकारात्मक आणि आवश्यक ते बदल करण्याची संधी आता आली आहे. असोसिएशन हे आपलेच आहे, आणि त्याचे भविष्य आपल्या हातात आहे. असोसिएशनचा मान्यता प्राप्त उपविधीची प्रत यापूर्वीच सर्व १ ते १४ संस्थांना देण्यात आली आहे.

SCN वसाहतीचा भविष्यात होणारा पुनर्विकास/व्यवस्थापन यामध्ये सभासदांचे व्यापक हिताचा दृष्टीकोन समोर ठेवून सदर उपविधीमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत आपल्या संकुलातील सभासदांनी पुढाकार घ्यावा अशी विनंती आहे

या प्रक्रियेसाठी आपण एक **"उपविधी दुरुस्ती समिती"** गठीत करणार आहोत, ज्यामध्ये असोसिएशनचे कार्यकारिणी समिती व उपसमिती मिळून सकारात्मक विचार करणारे अभ्यासू ३ सदस्य आणि एस.सी.एन वसाहतीतील सर्व १४ संस्थांमधील ३ सभासद असे मिळून एकूण ६ सदस्यांची समिती असेल. आवश्यकतेनुसार एकाद्या अनुभवी वकिलांचे मार्गदर्शन घेण्यात येईल किंवा समाविष्ट करण्यात येईल.

ज्या सभासदांना व सदस्यांना उपविधी दुरुस्ती समितीत काम करण्याची इच्छा आहे, त्यांनी आपले नावाचा तपशील असोसिएशनच्या कार्यालयात दिनांक २३/०८/२०२५ रोजी पर्यंत जमा करावा. अर्जदारांची संख्या जास्त झाल्यास, सर्व अर्जदारांची एकत्र बैठक घेऊन त्यातून ३ अधिक ३ सदस्य निवडले जातील.

सदरची समिती सर्व सूचना अभ्यासून रचनात्मक, सकारात्मक योग्य बदल निवडेल आणि त्यास अंतिम स्वरूप देईल. उपविधी दुरुस्ती मसुद्यास मंजुरी करिता असोसिएशनची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करून त्यावर चर्चा करून मंजुरी घेतली जाईल. त्यानंतर प्रस्तावित उपविधी दुरुस्ती करीता नमुन्यासह मा.उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा यांच्याकडे अंतिम मंजुरी करीता पाठवली जाईल.

असोसिएशनच्या उपविधीची प्रत संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहे. SCN वसाहतीतील सर्व १४ संस्थेतील सभासदांना कळविण्यात येते कि, आपणास ज्या ठिकाणी बदल आवश्यक वाटतात, त्या बदलांचा तपशील सोबत जोडलेल्या नमुन्यात भरून १० सप्टेंबर २०२५ पूर्वी कार्यालयात जमा करा. आपल्या प्रत्येक सकारात्मक कल्पना किंवा सूचनेला महत्त्व आहे. नमुन्यात आलेल्या अर्जांचा विचार केला जाईल.

सराफ चौधरी नगर को-ऑप. हौ. सोसायटीज असोसिएशन
नोंदणी क्र. एमयुएम/एमएचएडीबी/जीईएन/ओ/१३५२३/ २०२२-२०२३

# सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.

नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३

अ/०६, ५१,५२,५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल,. कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

संदर्भ क्र. : SCN·ASSOC/77/2025 दिनांक : 17/08/2025

हे आपले असोसिएशन आहे आणि ते अधिक सक्षम,पारदर्शक व लोकहितवादी व्हावे यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करायला हवं. ही फक्त एक औपचारिक प्रक्रिया नाही – ही आपली संधी आहे एकत्र विचार करण्याची, पारदर्शकतेने निर्णय घेण्याची आणि आपल्या असोसिएशनला अधिक मजबूत करण्याची. चला, आपण सर्व मिळून ही जबाबदारी स्वीकारूया.

पुनर्विकास प्रकल्पाचे व असोसिएशनचे कामकाजाची माहिती वेळोवेळी सराफ चौधरी वसाहतीतील सर्व सभासद रहिवाशांना कळविण्याचे तजवीज ठेवली आहे.

आपले विश्वासु

(सही) उपाध्यक्ष श्री.पांडुरंग कानडे

(सही) सचिव श्री. हिम्मतराव पाटील

(शिक्का: सराफ चौधरी नगर को-ऑप. हौ. सोसायटीज असोसिएशन लि., नोंदणी क्र. एमयुएम/एमएचएडीबी/जीईएन/ओ/१३५२३/२०२२-२०२३)

**टीप:-** १ ते १४ संस्थांच्या अध्यक्ष सचिव यांना विनंती करण्यात येते की, हे परिपत्रक आप-आपल्या संस्थेतील सर्व सभासदांना देण्याची व्यवस्था करावी.

| ENCLOSURE - III | | | |
|---|---|---|---|
| SARAF CHOUDHARI NAGAR CO-OP. HOUSING SOCIETY'S ASSOCIATION LTD. | | | |
| PROPOSED AMENDMENTS TO BYE-LAWS AS APROVED IN THE AGM/ SGM MEETING. Dated | | | |
| EXISTING BYE-LAW NO | WORDING OF THE EXISTING BYE-LAWS | WORDING OF THE PROPOSED BYE-LAWS | REASON FOR THE PROPOSED AMENDMENTS |
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

सराफ चौधरी नगर को-ऑप. हौ. सोसायटीज असोसिएशन लि.
नोंदणी क्र. [illegible]